महिला आरटीओ अधिकाऱ्याच्या निलंबनाचा प्रस्ताव धूळखात!

सीमा तपासणी नाक्यावरील लाच प्रकरण

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नागपूर : कांद्री सीमा तपासणी नाक्यावरील लाच प्रकरणात लाचलुचपत प्रतिबंध विभागाने (एसीबी) मोटार वाहन निरीक्षक गीता शेजवळ यांच्या निलंबनाचा प्रस्ताव परिवहन खात्याला दिला होता. परंतु अद्यापही निलंबन झालेले नाही. त्यातच शेजवळ या त्यांना मुख्यमंत्र्यांचे पाठबळ प्राप्त असल्याचा दावा करत असल्याची तक्रार आहे.

कांद्री तपासणी नाक्यावर ४ मे २०२३ रोजी एका खासगी वाहनाला तपासणी न करता जाऊ देण्यासाठी लाचेची मागणी करण्यात आली होती. वाहनधारकाने एसीबीकडे तक्रार केल्यावर तेथे सापळा रचून काही खासगी व्यक्तींना लाच घेताना पकडले गेले. आरोपींनी गीता शेजवळांसाठी लाच घेतल्याचे सांगितले. परंतु येथे शेजवळ आढळल्या नाहीत. त्यावर आरोपींनी शेजवळांनी पळ काढल्याचे सांगितले.

दरम्यान, लाचलुचपत प्रतिबंध विभागाने त्यांच्या स्तरावर चौकशी करून नागपूरच्या प्रादेशिक परिवहन विभागाला शेजवळ यांना निलंबित करण्याबाबत पत्र दिले होते. त्यावरून नागपूर कार्यालयाने राज्याच्या परिवहन खात्याला निलंबनाचा प्रस्ताव पाठवला. परंतु अद्यापही त्याला मंजुरी मिळालेली नाही. शेजवळ या वारंवार त्यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे पाठबळ असल्याचा दावा आपल्या वरिष्ठांसमोर करीत असल्याची तक्रार आहे. त्यामुळे त्यांचे निलंबन न होण्यामागे मुख्यमंत्री कार्यालयाचा हस्तक्षेप तर नाही ना, असा प्रश्न महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमेटीने परिवहन आयुक्त विवेक भिमनवार यांना १८ डिसेंबरला निवेदनाद्वारे केला आहे.

या विषयावर परिवहन आयुक्त विवेक भिमनवार यांच्याशी भ्रमणध्वनीवर संपर्क साधला असता त्यांनी बैठकीत व्यस्त असल्याचे सांगत नंतर बोलणार असल्याचे सांगितले.

'जीवन तरंग' पुस्तकाचे प्रकाशन

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नागपूर : डॉ. प्रमोद कोलवाडकर यांच्या कथा म्हणजे वैद्यकीय क्षेत्रातील सच्च्या अनुभवांचे कथन आहे. वैद्यकीय क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभवांचा खजिना डॉ. कोलवाडकरांकडे असून तो त्यांनी त्यांच्या आजवर प्रकाशित झालेल्या ११ कथासंग्रहांतून अतिशय रोचक पद्धतीने मांडला आहे. त्यांच्या कथांमधे केवळ रंजकता नसून विविध आजारांची माहिती अतिशय सोप्या पद्धतीने आपल्यापर्यंत पोहोचते, असे प्रतिपादन ज्येष्ठ संपादक शशिकुमार भगत यांनी केले.

हॉटेल सेंटर पॉईंट येथे आयोजित डॉ. प्रमोद कोलवाडकर यांच्या 'जीवन तरंग' या कथासंग्रहाच्या प्रकाशन सोहोळ्यात ते बोलत होते. 'जीवन तरंग' या पुस्तकाचे प्रकाशन ज्येष्ठ संपादक कमलाकर धारप यांच्या हस्ते झाले. यावेळी व्यासपीठावर डॉ. प्रमोद कोलवाडकर, ज्येष्ठ संपादक सुधीर पाठक आणि साहित्य प्रसार केंद्राचे संचालक मकरंद कुलकर्णी उपस्थित होते. गेल्या तेरा वर्षांत अकराव्या पुस्तकाचे प्रकाशन करणे हा एक विक्रमच होय. मराठी कथा लेखनात अनेक प्रवाह आहेत. वेगवेगळ्या विषयांवर कथालेखन करताना, आपल्या अनभवाचे सार त्यात व्यक्त करताना खरे कौशल्य लागते. 'जीवन तरंग' या कथासंग्रहात नवनवीन प्रसंग डोळ्यासमोर येतात. त्यातही वैद्यकीय क्षेत्रातील एक-एक प्रसंग पूर्णतः रममाण करणारे असल्याचे स्पष्ट मत ज्येष्ठ संपादक कमलाकर धारप यांनी व्यक्त केले. उत्तम आरोग्यासाठी नवनवीन विषयावर लेखन करणे आवश्यक झाले आहे. अकराव्या कथासंग्रहाचे प्रकाशन होत असताना व स्वतःचे विचार कथासंग्रहात मांडताना जीवनाचा खरा आनंद मिळतो. दरवर्षी एकाच विषयावर मात्र वैविध्यतापूर्ण कथा लिहिताना वैद्यकीय ज्ञानाचा व अनुभवाचा लाभ होत असल्याचे डॉ. प्रमोद कोलवाडकर यांनी सांगितले. प्रास्ताविक विनोद कोलवाडकर यांनी व संचालन सुधीर पाठक यांनी केले. मकरंद कुलकर्णी यांनी आभार मानले. याप्रसंगी अनंत देव, डॉ. मधुकर आपटे, बाबुराव चिंघलकर, नरेश सब्जीवाले, विनोद लोकरे तसेच साहित्य आणि पत्रकारितेच्या क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

विदर्भातील सिंचन प्रकल्प कधी पूर्ण होणार?

'जनमंच'चा सवाल

लोकसत्ता प्रतिनिधी

नागपूर : विदर्भात अधिवेशन घ्यायचे, त्यावर शेकडो कोटी खर्च करायचे आणि विदर्भाच्या समस्यांवर काहीच ठोस निर्णय किंवा चर्चाही करायची नाही. असेच चालू राहणार असेल तर नागपूरच्या अधिवेशनाचा काहीच उपयोग होणार नाही. विदर्भातील शेतकरी आत्महत्यांचे प्रमुख कारण असलेले सिंचन प्रकल्प केव्हा पूर्ण होणार, याचे उत्तर सरकारने हिवाळी अधिवेशनात दिले पाहिजे, अशी मागणी जनमंचचे अध्यक्ष राजीव जगताप यांनी केली.

यावर्षी जानेवारी ते ऑगस्ट या आठ महिन्यांमध्ये १८०९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. यातील बरेचसे शेतकरी हे विदर्भातील असून सिंचनाचा अभाव हे त्याचे प्रमुख कारण आहे. विदर्भातील अनेक प्रकल्प कित्येक वर्षांपासून रखडले आहेत. यामध्ये गोसीखुर्द प्रकल्प, जिगाव प्रकल्प, उमा बॅरेज, काटेपूर्णा बॅरेज, नेर धामना प्रकल्प, निम्न वर्धा प्रकल्प, तुरा गोंदी प्रकल्प, सतरापूर प्रकल्प, आजन सारा प्रकल्प, घोडाझरी कालवा, हुमन प्रकल्पाचा समावेश आहे. या अधिवेशनात या अपूर्ण प्रकल्पांवर चर्चा होऊन, सिंचनाच्या सोयी विदर्भातील शेतकऱ्यांना केव्हा उपलब्ध होणार, यावर ठोस चर्चा होणे अपेक्षित होते. परंतु दुर्दैवाने काहीही झालेले नाही, असेही जनमंचने म्हटले आहे.

'संत्री उत्पादकांना भरपाईचा प्रस्ताव लवकर मंत्रिमंडळासमोर'

लोकसत्ता प्रतिनिधी

नागपूर : बांगलादेश सरकारने भारतीय संत्र्याच्या आयातीवर मोठी शुल्कवाढ केल्याने अडचणीत आलेल्या संत्री उत्पादकांना प्रतिहेक्टरी मदत देण्यासाठी सुमारे ६०० कोटींचा नुकसान भरपाईचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर आणण्यात येणार आहे, असे पणन मंत्री अब्दुल सत्तार यांनी सांगितले.

बांगलादेश सरकार यावर्षी भारतातून बांगलादेशात जाणाऱ्या संत्र्यावर प्रतिकिलो ८८ रुपये कर आकारत आहे. दोन वर्षांपूर्वी ही रक्कम प्रतिकिलो १८ रुपये होती. या आयात शुल्कवाढीमुळे नागपूर, विदर्भातील शेतकऱ्यांना फटका बसला आहे.

संत्री निर्यातीत मोठी घट झाली आहे. परिणामी, स्थानिक बाजारात आवक वाढली आणि संत्र्याचे भाव गडगडले. विदर्भात संत्री प्रक्रिया उद्योग नसल्याने शेतकऱ्यांना मिळेल त्या दरात संत्री विकणे भाग पडले. त्यातून त्यांचे मोठे नुकसान झाले.

यासंदर्भात मोहन मते यांनी विधानसभेत प्रश्न उपस्थित केला. त्यावरील उत्तरात पणन मंत्री अब्दुल सत्तार यांनी सांगितले, की संत्री निर्यातदारांना बांग्लादेशाने आयात शुल्क वाढवल्यामुळे आर्थिक फटका सहन करावा लागला.

केरळमधील करोना उद्रेकाची धास्ती

पुणे : केरळमध्ये मागील काही दिवसांपासून करोना रुग्णसंख्येत मोठी वाढ नोंदविण्यात आली आहे. तसेच करोना विषाणूच्या जेएन १ या अतिसंसर्गजन्य उपप्रकाराचा पहिला रुग्ण आढळून आला आहे. या पार्श्वभूमीवर केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना सावधगिरी आणि दक्षता बाळगण्याचे निर्देश दिले आहेत.

केंद्रीय आरोग्य सचिव सुशांत पंत यांनी याबाबत सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना सोमवारी पत्र पाठविले आहे. त्यात म्हटले आहे की, करोना विषाणूचे नवनवीन उपप्रकार येत असल्याने संसर्गात वाढ होत आहे. अशा वेळी सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेसमोर आव्हानात्मक स्थिती निर्माण होत आहे. त्याचा सामना करण्यासाठी खबरदारी घेण्याची आवश्यकता आहे.

तिरुवअनंतपुरम : केरळमध्ये सोमवारी करोनाचे १११ नवीन रुग्ण आढळले. त्यामुळे राज्यातील एकूण करोना रुग्णांची संख्या १ हजार ६३४ इतकी झाली आहे. तसेच सोमवारी एका रुग्णाचा मृत्यू झाल्याची माहिती राज्याच्या आरोग्य विभागाकडून देण्यात आली.

मीरा फडणीसांच्या चौकशीस पोलिसांची टाळाटाळ

(पान १ वरून) फडणीस यांच्या संपर्कात होता. त्यांनी त्यांच्या संपर्कात असलेल्या अनेकांशी अनिरुद्धची ओळख करून दिली होती. त्यांच्यावर विश्वास ठेवून यवतमाळ, नागपूर, जालना, मुंबई, पुणेसह राज्यभरातून शेकडो गुंतवणूकदार अनिरुद्धशी जुळले. त्यांच्याकडून अनिरुद्धने गुंतवणुकीच्या नावाखाली कोट्यवधी रुपये गोळा केले. गुंतवणूकदारांचा विश्वास बसावा म्हणून यासंदर्भातील एक कार्यक्रम (टेंडर अवॉर्ड) राष्ट्रपती भवनात होणार असल्याचीही बतावणी केली. प्रथम हा कार्यक्रम १२ सप्टेंबर २०२२ ला मुंबईच्या ताज हॉटेलमध्ये होणार, असे सांगितले. नंतर हा कार्यक्रम रद्द झाल्याचे सांगून वेगवेगळ्या तारखा दिल्या. अखेर त्याने २९ एप्रिल २०२३ ते ७ मे २०२३ दरम्यान राष्ट्रपती भवनात हा कार्यक्रम होणार असल्याचे सांगून यासाठी बनावट निमंत्रण पत्रिका तयार केल्या. त्यात पंतप्रधान, केंद्रीय गृहमंत्री यांच्यासह अभिनेते अमिताभ बच्चन, कंगना राणावत यांची नावे मुख्य अतिथी म्हणून टाकली. या बनावट निमंत्रण पत्रिका त्याने मीरा फडणीस यांच्या हस्ते एका कार्यक्रमात गुंतवणूकदारांना दिल्या होत्या.

७८ खासदार निलंबित

(पान १ वरून) आले आहे. त्यामुळे दोन्ही सदनांतील एकूण १४ खासदारांच्या लेखानुदानासाठी होणाऱ्या हंगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनातील कामकाजामध्ये सहभागी होण्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

संसदेच्या सुरक्षाभंगाच्या प्रकरणावर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या निवेदनासाठी गेल्या आठवड्यापासून विरोधक सभागृहांमध्ये आक्रमक झाले असून शहांच्या निवेदनाशिवाय सभागृहाचे कामकाज चालू न देण्याचा इशारा 'इंडिया'च्या घटक पक्षांनी दिली होता. शुक्रवारीही सकाळच्या सत्रामध्ये दोन्ही सभागृहांमध्ये झालेल्या गोंधळानंतर लोकसभेतील १३ व राज्यसभेतील एक अशा १४ खासदारांना निलंबित केले गेले. या कारवाईनंतर विरोधी पक्षांनी केंद्र सरकारविरोधातील भूमिका आणखी तीव्र करत सोमवारी सभागृहांतील कामकाजात अडथळे निर्माण केले.

दोन्ही सभागृहांमध्ये सोमवारी निलंबित झालेल्या खासदारांमध्ये काँग्रेसचे सर्वाधिक २९, तृणमूल काँग्रेसचे १५ तर द्रमुकचे १४ खासदारांचा समावेश आहे.

विरोधकांच्या आवाजातील धार बोथट

लोकसभेमध्ये काँग्रेसचे गटनेते अधीर रंजन चौधरी, तृणमूल काँग्रेसचे कल्याण बॅनर्जी, सौगत राय, द्रमुकचे गटनेते टी. आर. बालू, दयानिधी मारन तर राज्यसभेमध्ये काँग्रेसचे के. सी. वेणुगोपाल, रणदीप सुरजेवाला, जयराम रमेश, रामगोपाल वर्मा अशा ज्येष्ठ सदस्यांवर कारवाई केल्यामुळे सभागृहांमध्ये केंद्र सरकारविरोधातील विरोधकांचा आवाजातील धार बोथट झाली आहे. विरोधी खादारांवर झालेली ही कारवाई अधिवेशनाच्या उर्वरित काळासाठी असल्यामुळे लोकसभेत पुढील चार दिवस विरोधी बाकांवर शुकशुकाट पाहायला मिळू शकतो. अधिवेशनाच्या शेवटच्या आठवड्यामध्ये कार्यक्रमपत्रिकेवर महत्त्वाची चार विधेयके आहेत. लोकसभेत केंद्रीय निवडणूक आयुक्तांची नियुक्तीसंदर्भातील विधेयकाला मंजुरी मिळालेली नाही. या विधेयकासह फौजदारी संहितेसंदर्भातील नवी विधेयकेही दोन्ही सदनांमध्ये मांडली जाणार आहेत. विरोधकांच्या रिकाम्या बाकांसमोर मंगळवारी ही विधेयके मांडली जाण्याची शक्यता आहे.

शिक्षक सहकारी बँक लि. (शेड्यूल्ड बँक)

मुख्य कार्यालय, गांधीसागर, महाल, नागपूर-440018

वित्तीय मालमत्तेच्या सुरक्षिततीकरण आणि पुर्ननिर्माण आणि सुरक्षा अधिकारी (अंमलबजावणी) ॲक्ट,2002 च्या नियम 8 (6) सह वाचल्या जाणा–या सिक्युरीटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) नियम 2002 अन्वये.

स्थावर मालमत्ता विक्रीची सूचना

ज्याअर्थी हस्ताक्षरकर्ताने सुरक्षा अधिकारी (अमंलबजावणी) ॲक्ट 2002 च्या नियम 13(2) अन्वये कर्जदारांना/सहआवेदकांना/गहाणदारांना डिंमाड नोटीस पाठवुन नोटीसमध्ये नमुद केलेले व्याज व ईतर खर्चाची परतफेड करण्याची नोटीस जारी करण्यात आली होती. आणि ज्या अर्थी कर्जदाराने रक्कमेची परतफेड करण्यास कसुर केलेला आहे. अधिकृत अधिकारी यांनी खालील नमुद तारखेला सदर मालमत्तेचा ताबा घेतला आहे. त्याअर्थी हस्ताक्षरकर्त्याने खालील वर्णीत संपत्तीचा ''जेथे आहे जशी आहे'', ''जे आहे जसे आहे'' च्या आधारावर विक्री करण्याकरीता खरेदी इच्छुक पक्षांकडुन मोहरबंद लिफाफ्यात बोली प्रस्ताव (निवीदा) आमंत्रीत करीत आहे. कोरे निवीदापत्र बॅकेच्या मुख्यालयातुन किंवा वरोरा शाखेतुन रु 200/– व त्यावरील 18 टक्के जी.एस.टी. रोखीने भरुन (ना परतेय) प्राप्त करता येतील.

अनु क.	कर्जदार/गहाणदार यांचे नांव	कर्जदाराची बँके प्रती असलेली देयता	संपत्तीचे विवरण	लिलाव तारीख, वेळ, राखीव किंमत, अनामत रक्कम, टेंडर फॉर्म जमा करण्याची अंतीम तारीख, वेळ,
1.	वरोरा शाखाः– 1) मे.दशमेश फुड्स (कर्जदार) तर्फे प्रोप्रायटर 2) श्री.राजेन्दरसिंग लखवंत सिंग (प्रोप्रायटर/कर्जदार/गहाणदार) 3) श्रीमती.कुलवंतकौर लखवंत् सिंग (सहआवेदक/गहाणदार)	ओव्हर ड्राफ्ट कर्जाकरीता दि.30/04/2023 पर्यंत.रु 32,47,469.50 व त्यावरील दि 01/05/2023 पासुनचे 13.50 टक्के दराने पुढील व्याज व इतर खर्च. लोन अगेन्स्ट प्रॉप्रटी कर्जाकरीता दि.30/04/2023 पर्यंत.रु. 1,27,34,423.00 व त्यावरील दि 01/05/2023 पासुनचे 13.50 टक्के दराने पुढील व्याज व इतर खर्च. मागणी सुचना दिनांक 20/05/2023 ताबा दिनांक 19/08/2023 सांकेतिक ताबा	श्रीमती कुलवंतकौर लखवंत सिंग यांच्या मालकीची स्थावर मालमत्ता प्लॉट क्रं.55 (खुली जागा),सर्व्हे क्रं.232, बी.क्रमांक 193, पटवारी हल्का क्रं.17, मौजा चिनोरा, ग्रामपंचायत चिनोरा ज्याचे अंदाजे क्षेत्रफळ 150.00 चौ.मी.(1614.00.चौ.फुट), ग्रामपंचायत चिनोरा यांचे हद्दीतील, तहसिल वरोरा, जिल्हा चंद्रपूर,	दि. 05/01/2024 दुपारी 12.30 वाजता राखीव किंमत रु 11.00 लाख अमानत रक्कम रु 0.50 लाख टेडंर फार्म दिनांक 04/01/2024 ला सांयकाळी 5.00 पर्यंत जमा करावे.

प्रस्ताव (निविदा) सोबत शिक्षक सहकारी बॅक लि, नागपूर च्या नावे अनामत रक्कम म्हणुन वर नमुद राशीचे पे ऑर्डर/डीडी/ईलेक्ट्रॉनिक ट्रान्सफर (आयएफसी कोड(SKSB0000002, A/c No.099150000000394 ईलेक्ट्रॉनिक ट्रान्सफर करीता) (समायोजेय/परतेय) भरणे आवश्यक आहे. आपली निविदा अधिकृत अधिकारी, शिक्षक सहकारी बॅक लि., मुख्य कार्यालय, नागपूर किंवा व्यवस्थापक, वरोरा शाखा यांना वर नमुद केल्याप्रमाणे आणुन देण्यात यावी. या निविदा वर नमुद लिलावाच्या तारखेला लिलावच्या वेळी बँकेच्या शाखा वरोरा जिल्हा चंद्रपूर येथे उघडण्यात येतील. स्विकारण्यात आलेल्या बोलीच्या 25% टक्के रक्कम त्याच दिवशी ताबडतोब नगद/चेक/ईलेक्ट्रॉनिक ट्रान्सफर व्दारे जमा करावी लागेल व उर्वरीत 75% टक्के रक्कम लिलावाच्या तारखेपासुन 15 दिवसांचे आत जमा करावी लागेल. तसेच गहाण संपत्तीवर देय असलेली रक्कम जसे टॅक्स, ईलेक्ट्रीक बिल व ईतर सर्व वैधानिक खर्च खरेदीदारास द्यावा लागेल. विक्रीप्रमाणपत्र करीता लागणारा खर्च जसे स्टॅम्प डयुटी, रजिस्ट्रेशन फी इत्यादी खर्च खरेदीदारास दयावा लागेल. विक्रीप्रमाणपत्र करीता लागणारे ना हरकत प्रमाणपत्र जसे नगर परिषद/ग्राम पंचायत/म्युतिसिपल कॉरपोरेशन/नझुल/सोसायटी इत्यादी प्राप्त करण्याची जबाबदारी खरेदीदार यांची राहील. सदर्हू मालमत्तेसंबधी बॅकेकडे उपलब्ध असलेले दस्ताऐवज खरेदीदारास देण्यात येईल. बॅकेकडे उपलब्ध नसलेले दस्ताऐवज देण्यास बॅक जबाबदार राहणार नाही. हस्ताक्षरकर्ता यांच्याकडे कुठलेही कारण न देता बोली स्वीकार/अस्वीकार किंवा तहकुब/स्थगित करण्याचे पुर्ण अधिकार राखुन ठेवलेले आहे. उपरोक्त संपत्तीची प्रत्यक्ष पाहणी करीता अधिकृत अधिका–याशी 8830881795 किंवा व्यवस्थापक, वरोरा शाखा मो.9423636995 या नंबरवर कार्यालयीन वेळेत संपर्क करावा.

दिनांक :– 18/12/2023
स्थळ :– नागपूर

अधिकृत अधिकारी
शिक्षक सहकारी बँक लि.,नागपुर.मो.क्रं.8830881795

जाहिर सुचना

प्रस्तावित रेसिडेन्शिअल आणि कमर्सियल सर्वे नं. ४१५/१ ४१६/२ (सिटी सर्वे न. ३३६) मौजा NGP गणेश पेठ बस स्टॅन्ड जवळ नागपूर, महाराष्ट्र येथे आहे. या प्रकल्पाला महाराष्ट्र सरकार यांच्याकडून दिनांक १८.०५.२०२३रोजी विस्तारासाठी पर्यावरण विषयक मंजुरी देण्यात आली आहे. सदर पर्यावरण विषयक मंजुरीची प्रत PARIVESH या संकेतस्थळावर उपलब्ध आहे https://environmentclearance.nic.in/TrackState_proposal.aspx?type=EC&status=EC_new&statename=Maharashtra&pno=SIA/MH/INFRA2/414172/2023&pid=215222

नागपुर, दि. 18.12.2023

आर संदेश एल.एल.पी.

महानिर्मिती

इ–निविदा सूचना
क्र.ना.औ.वी.कें/२०२३–२४/३९

अ. क्र.	विभाग / निविदा क्र.	निविदा तपशील	अंदाजे रक्कम (रु.) इसारा रक्कम (रु)
१.	३००००४४००८ / अकाऊंट	लेखा विभागात दैनंदिन कामासाठी मदत करण्याचा कंत्राट.	१३,०६,७७५/– / १६,५७०/–
२.	३००००४४१७० / ओडीपी	बी.पी.एच सह ॲश स्लरी पंप हाऊस ते राख बंधारे परिसरापर्यंत राख स्लरी पाईप लाईन आणि इतर संबंधित कामांसाठी वार्षिक कंत्राट.	८७,२८,०७०/– / ९०,८००/–
३.	३००००४४०६९ / सीएचपी	सीएचपी ३ येथे इम्पॅक्ट क्रशर १ आणि २ साठी बीटर आर्मची खरेदी.	९,८४,१५०/– / १३,३५०/–
४.	३००००४४१५१ / सीएचपी	सीएचपी २ येथे विविध कोळसा ट्रान्सफर च्युटसच्या मुख्य देखभालीचे काम.	८४,९०,१८१/– / ८८,५००/–
५.	३००००४४१६५ / बीएम	एओएच आणि शॉट शटडाऊन दरम्यान कोणत्याही एका बॉयलरच्या व्हॅक्युम प्रक्रियेव्दारे बॉयलर, पेंट हाऊस, काऊंटर चेंबर (कंट हाऊस), डॉग हाऊसमधुन राख बाहेर काढण्याचे काम.	२४,००,०००/– / २७,५००/–
६.	३००००४४१६८ / बीएम	पेट हाऊस, डॉग हाऊस, कॅट हाऊस आणि एअर प्री हिटर टॉप गाईड बेअरिंग एरियामध्ये एअरसील चा पुरवठा आणि स्थापना.	५०,५८,०००/– / ५४,०८०/–

प्रत्येक निविदा किंमत: रु. ११८०/–, अधिक माहिती व अद्यतनांसाठी कृपया https://eprocurement.mahagenco.in येथे भेट द्यावी.

मुख्य अभियंता, नाशिक औ.वि.केंद्र, एकलहरे

OMKARA ASSETS RECONSTRUCTION Pvt. Ltd.

ओमकारा ॲसेटस् रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि.
CIN: U67100TZ2014PTC020363
कॉर्पोरेट कार्यालयः कोहिनूर स्क्वेअर, सत्तेचाळीसावा मजला, एन.सी.केळकर मार्ग, आर.जी. गडकरी चौक, दादर (पश्चिम), मुंबई - 400028.
ईमेलः jigar.patel@omkaraarc.com | मोबा.: +91 9987400988

[परिशिष्ट - IV - ए] [नियम 8(6) ची तरतूद पाहावी] अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलावासाठी जाहीर सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 9(1) सह वाचण्यात येणारया नियम 8(6) च्या तरतुदींसह वाचण्यात येणारया सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल अॅसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, 2002 अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

याद्वारे कर्जदार व जामीनदार आणि आम जनतेस सूचित करण्यात येते की सुरक्षित धनकोकडे तारण / भारग्रस्त असलेल्या खालील वर्णनाच्या अचल मालमत्तेचा (ओमकारा पीएस 25/2021-22 चे ट्रस्टी म्हणून काम पाहणारया) ओमकारा ॲसेटस् रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि. (ओएआरपीएल) च्या प्राधिकृत अधिकारयांनी ताबा घेतलेला आहे. पुढे, दि. 28.12.2021 रोजीच्या अभिहस्तांकन करारान्वये ओएआरपीएल यांनी दि खामगाव अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. खामगाव (अभिहस्तांकनकर्ता) यांचेकडून खालील खात्यांची संपूर्ण थकबाकी कर्जे अंतर्निहित अनामतीसह अभिहस्तांकनकर्त्यांकडून अधिग्रहित केली आहेत. त्यानुसार, ओएआरपीएल यांनी अभिहस्तांकनकर्त्यांची जागा घेतलेली असून त्यांना थकबाकीची वसुली करण्याचा आणि अनामतीवर कारवाई करण्याचा अधिकार आहे. अभिहस्तांकनकर्त्यांच्या प्राधिकृत अधिकारयांनी ताबा घेतलेला असून ओएआरपीएल यांनी दि. 28.12.2021 रोजी अभिहस्तांकनकर्त्यांकडून ताबा घेतलेला आहे. ओएआरपीएल चे प्राधिकृत अधिकारी थकबाकीच्या वसुलीसाठी खाली नमूद अनामत मालमत्तांची विक्री करण्यास इच्छुक आहेत आणि त्यामुळे, अनामत मालमत्तांच्या खरेदीसाठी मोहरबंद लिफाफ्यांमधील निविदा / बोली आमंत्रित आहेत. सदर मालमत्तांची खाली दर्शविलेल्या संबंधित कर्जदार / सह-कर्जदार / जामीनदार यांचेकडून सुरक्षित धनको म्हणून ओएआरपीएल यांना घेणे असलेल्या संबंधित स्तंभामध्ये दर्शविलेल्या रकमेच्या वसुलीसाठी ''जशी आहे जेथे आहे'', ''जशी आहे जे काही आहे'', ''तेथे जे काही आहे'' आणि ''उपाय नाही'' तत्त्वावर सर्फेसी अधिनियमातील अनुच्छेद 13(2) (4) च्या तरतुदींतर्गत अधिकार व हक्कांचा वापर करीत विक्री करण्यात येईल. खाली कर्जदार/जामीनदार/गहाणकार, अनामती, थकबाकी, अनु. 13(2) अंतर्गत पाठविण्यात आलेल्या मागणी सूचनेचा दिनांक, आरक्षित किंमत, बोली वृद्धी रक्कम, बयाणा रक्कम, पाहणीचा दिनांक व वेळ इ. चा तपशील देण्यात आलेला आहेः

लॉट क्र.	कर्जदार / जामीनदार / गहाणकार	अनामत मत्तेचे तपशील	मालमत्तेचे मालक	मागणी सूचना दिनांक व रक्कम	आरक्षित किंमत	बोली वृद्धी रक्कम	बयाणा रक्कम	पाहणीचा दिनांक व वेळ
1	1. स्वस्तिक एन्टरप्रज्रेस (कर्जदार) द्वारे त्यांचे भागीदार 2. श्री त्रिलोकचंद सुगनचंद सावला (भागीदार) 3. श्री बाबूलाल सुखराजजी खिवसरा (भागीदार) 4. श्रीमती आशा त्रिलोक सावला (जामीनदार) 5. श्री मनीष धरमचंद सावला (जामीनदार)	व्यावसायिक दुकान क्र. 9 + 10, तळ मजला, कावेरी कॉम्प्लेक्स, प्लॉट क्र. 13/2, 13/3, नवा वॉर्ड क्र. 25 (जुना वॉर्ड क्र. 6), अमरावती - 444606, दुकान क्र. 9 चे क्षेत्रफळ सुमारे 120 चौ.फु. आणि दुकान क्र. 10 चे सुमारे 110 चौ.फू. **चतुःसीमाः पूर्वेस** – केडिया हाऊस, **पश्चिमेस** - सावला हाऊस, **उत्तरेस** - मोकळी जागा, **दक्षिणेस** - उस्मानिया मस्जिद एसटी स्टँड रोड. लँडमार्कः उस्मानिया मस्जिदजवळ. गूगल कोऑर्डीनेट्स - 20.929692, 77.761269	श्री त्रिलोकचंद सुगनचंद सावला	दिनांकः 29.06.2004 रु. 34,09,539.59 (रुपये चौतीस लक्ष नऊ हजार पाचशे एकोणचाळीस आणि एकोणसाठ पैसे फक्त)	रु. 23,00,000/-	रु. 20,000/-	रु. 2,30,000/-	दिनांकः 12.01.2024 वेळः स. 11.00 ते दु. 12.00 वाजेपर्यंत
2		निवासी प्लॉट स.क्र. 39, प्लॉट क्र. 06, अरिहंत हॉस्पिटलजवळ, बडनेरा रोड, अमरावती-444601. **चतुःसीमाः पूर्वेस** -20 फुटी रस्ता, **पश्चिमेस** - हेडा यांचे घर, **उत्तरेस** - लेलाबाई यांचे घर, **दक्षिणेसः** 20 फुटी रस्ता. **लँडमार्कः** अरिहंत हॉस्पिटलजवळ. **गूगल कोऑर्डीनेट्स**– 20.910393, 77.751402			रु. 1,14,38,000/-	रु. 25,000/-	रु. 11,43,800/-	दिनांकः 12.01.2024 वेळः दु. 12.30 ते 01.30 वाजेपर्यंत

खाते क्र.: 055505010193, लाभार्थ्याचे नावः ओमकारा पीएस 25/2021-22 ट्रस्ट, बँकेचे नावः आयसीआयसीआय बँक, शाखाः बीकेसी मुंबई, आयएफएससी कोडः ICIC0000555

सहभागासाठी बोली पत्र/केवायसी दस्तावेज/बयाणा रकमेच्या भरण्याचा पुरावा सादर करण्यासाठी शेवटचा दिनांक व वेळ :	23 जानेवारी 2024 रोजी सायं. 6.00 वाजेपर्यंत
ई-लिलावाचा दिनांक व वेळ :	25 जानेवारी 2024 रोजी स. 11.00 ते दु. 12.00 वाजेपर्यंत

लिलावाच्या अटी व शर्तीः विक्रीच्या अटी व शर्तींच्या तपशीलासाठी कृपया http://omkaraarc.com/auction.php मध्ये दिलेली लिंक पाहावी.
सदर लिलाव ओएआरपीएल द्वारे ऑनलाईन राबविण्यात येईल. बयाणा रक्कम (मूळ डीडी/पे ऑर्डर च्या स्वरुपात किंवा एनईएफटी/आरटीजीएस द्वारे भरणा) सह बोली (ऑनलाईन तसेच छापील प्रतीमध्ये) सादर करण्याचा शेवटचा दिनांक आहे 23.01.2024 रोजी सायं. 6.00 वा. ज्या इच्छुक बोलीदारांनी बयाणा रक्कम जमा केली आहे आणि ज्यांना लॉगीन आयडी व पासवर्ड तयार करणे, डेटा अपलोड करणे, बोली सादर करणे, ई-बोली प्रक्रियेचे प्रशिक्षण इ. बाबत मदत हवी आहे ते ई-लिलाव सेवा पुरवठादार मे. सी1 इंडिया प्रा.लि. यांचेशी टेली. हेल्पलाईनः +91-7291981124, हेल्पलाईन ई-मेल आयडीः **support@bankeauctions.com,** श्री भाविक पंड्या, मोबाईलः 8866682937 ई-मेल **–maharashtra@c1india.com** येथे संपर्क साधावा आणि मालमत्तेशी संबंधित चौकशीसाठी प्राधिकृत अधिकारी श्री जिगर पटेल, मोबाईलः +91 9987400988 मेलः **jigar.patel@omkaraarc.com** यांचेशी संपर्क साधावा. इच्छुक बोलीदारांनी नादारी व दिवाळखोरी संहिता, 2016 चे पालन करावे आणि त्यातील अनुच्छेद 29ए अंतर्गत शपथपत्र द्यावे, तपशीलवार माहितीसाठी कृपया अटी व शर्ती पाहाव्यात.

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8(6) अंतर्गत विक्रीसाठी वैधानिक सूचना

ही सूचना वरील कर्ज खात्यामधील कर्जदारांसाठी सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8(6) अंतर्गत आणि सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल अॅसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, 2002 च्या तरतुदींतर्गत त्यांना वर नमूद दिनांकास व वेळी ई-लिलावाच्या माध्यमातून लिलाव / विक्री राबविण्यात येणार असल्याची सूचना देणारी आणि त्यांची इच्छा असल्यास विक्रीची प्रक्रिया समाप्त होण्याअगोदर कोणत्याही वेळी पुढील व्याज आणि सर्व खर्च, शुल्के व अधिभारांसह वर नमूद थकबाकी रकमेचा भरणा करून सदर मत्ता सोडवून घ्याव्यात असे आवाहन करणारी किमान 30 (तीस) दिवसांची अनिवार्य सूचनादेखील आहे. भरणा न केल्यास, सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8(5) अंतर्गत विहित करण्यात आलेल्या कोणत्याही पद्धतीने प्राधिकृत अधिकारी / सुरक्षित धनको ठरवितील त